लग्न म्हणजे बस्ता बस्ता म्हणजे राजेंद्र
१९५९ पासून राजेंद्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155

संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
एथनिक वेअर । बस्त्यासाठी खास सोय
नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग । होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

Sangamner । MAHMAR/2018/75654 । वर्ष ८ । अंक ७१ । २०/७/२०२५ (दैनिक) । किंमत रु.२/- । पाने ६

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट.. मिल असो वा मॉल.. सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
30% 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा राजपाल
संगमनेर (02425) 222226 । अ. नगर (0241) 2999299 । नारायणगाव (02132) 242132 । श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे मसाले SINCE 1992 चवीला खरे कोथमिरे!
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे, चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
कोथमिरे मसाले +91 9370584332 www.kothmiremasale.com

# वारंवार गुन्हा करणाऱ्या कसायांची आता खैर नाही!

## सरकारकडून कायद्यात बदलाचे संकेत

## कसायांच्या रोजीरोटीला पर्याय देण्याचीही गरज

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

गोवंश हत्याबंदी कायद्यात शिक्षेच्या कठोर तरतुदी नसल्याने राज्यात बेकायदा गोवंश कत्तलखाने लपुनछपून सुरु असल्याचे मान्य करीत त्या विरोधात सरकारची भूमिका कठोर असल्याचे मत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी व्यक्त केले. संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी शहरातील बेकायदा कत्तलखान्यांचा विषय उपस्थित करतानाच त्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना खोटी माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली होती. त्यावरील उत्तरात राज्यमंत्र्यांनी वरील मत व्यक्त करतानाच राज्य सरकार याबाबत गंभीर असल्याचे व लवकरच राज्याच्या गोवंश हत्याबंदी कायद्यात फेरबदल करुन वारंवार गुन्ह्यात सापडणाऱ्या आरोपींना दहा वर्षांच्या शिक्षेचे प्रावधान करणार असल्याची घोषणा त्यांनी केली. त्यामुळे बेकायदा गोवंश कत्तलखाने चालवणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. सध्याच्या तरतुदीनुसार कारवाई नंतरही कसायाला करता येत नाही. मात्र वरीलप्रमाणे कायद्यात बदल झाल्यास आरोपीला थेट कारागृहात टाकण्याचा अधिकार पोलिसांना प्राप्त होणार आहे.

राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा लागू होवून आता जवळपास दहा वर्षांचा काळ लोटत आहे. या कालावधीत संगमनेरसारख्या लाखभर लोकवस्तीच्या शहरात आजवर शेकडोवेळा पोलिसांनी वेगवेगळ्या ठिकाणांवर छापे घातले. त्यात कांपलेल्या गोवंश जनावरांचे लाखों किलो मांस, कत्तलीनंतरचे टाकावू अवयव, वाहतूक करणारी वाहने आणि अनेकवेळा जिवंत जनावरे असा कोट्यवधीचा मुद्देमालही वारंवार जप्त केला गेला. आजही तसाच प्रकार कायम आहे. चार वर्षांपूर्वी ठाण्यातील एका प्राणीमित्राच्या तक्रारीवरुन वरीष्ठ पातळीवरुन हालचाली होवून श्रीरामपूर विभागाचे तत्कालीन पोलीस उपाधिक्षक संदीप मिटके यांच्या नेतृत्त्वाखाली अहिल्यानगर पोलिसांनी भारतनगरमधील साखळी **(पान ३ वर)**

■ पाण्याच्या कारणाने सधन आणि बागायती असलेल्या संगमनेर तालुक्यात पशूधनही विपूल प्रमाणात आहे. हल्ली बहुतेक शेतकरी कुटुंब दूधाचा जोडधंदाही करीत असल्याने घरोघरी देशी आणि विदेशी गोवंश बघायला मिळतात. अशात विदेशी गोवंशाच्या गोऱ्ह्यांना खांदेच नसल्याने शेती व्यवसायात त्याचा काहीच उपयोग होत नाही. मात्र त्याचवेळी त्यांचा जन्म होताच त्यांना चारा आणि पाणी या दोन्ही गोष्टी चोवीस तास लागतात. त्यामुळे त्यांचा सांभाळ शेतकऱ्यांसाठी पांढरा हत्ती पोसण्यासारखा ठरतो. शासनाने शेतकऱ्यांची ही समस्या दूर केल्यास त्याचा मोठा परिणाम होईल. शिवाय गोवंशाची कत्तल करुन पोट भरणाऱ्या कुरेशी समाजाच्या रोजीरोटीचा प्रश्नही गांभीर्याने बघावा लागेल. मोठ्या प्रमाणात अशिक्षित असलेल्या या वर्गाला पर्यायी व्यवसाय उभारुन देण्याचीही तितकीच गरज आहे. या गोष्टींकडे सरकारने गांभीर्याने पाहिले तरच राज्यातील बेकायदा कत्तलखान्यांना आळा बसण्याची शक्यता आहे.

सेल सेल सेल सेल सेल सेल सेल
सुरु झालाय भव्य जागेत भव्य सेल
सेल SUPER SALE सेल
20 ते 50% पर्यंत डिस्काउंट
टी-शर्ट । जीन्स ₹100/- टॉप । लेगिंग ₹100/- चुडीदार । वनपीस ₹300/- फ्रॉक । वेस्टर्न ₹300/-
सारीका चिल्ड्रन अँण्ड लेडीज वेअर
बाजारपेठ, प्रतिभा फोटो शेजारी, संगमनेर 98223 58335

# लाभक्षेत्रासह पाणलोटातूनही पाऊस गायब!

## जिल्ह्यात लख्ख सूर्यप्रकाश; धरणांची स्थिती मात्र समाधानकारक

नायक वृत्तसेवा, अकोले

गेल्या आठवड्याभरापासून लाभक्षेत्रातून गायब झालेल्या पावसाने आता धरणांच्या पाणलोटातही जवळजवळ विश्रांती घेतली असून मागील चोवीस घाटघरमध्ये नोंद घेण्याइतपत पाऊस वगळता सर्वत्र लख्ख सूर्यप्रकाश बघायला मिळत आहे. त्यामुळे धरणांमध्ये सुरु असलेली पाण्याची आवकही रोडवली आहे. मात्र त्या उपरांतही भंडारदऱ्यातून विद्युत निर्मितीसाठीचा प्रवाह कायम असल्याने चोवीस तासांत पाणीसाठ्यात घट झाली आहे. निळवंडे धरणातून प्रवरापात्रात ३०० क्यूसेकचा प्रवाह सुरु असून कालव्यांना ५५० क्यूसेकने पाणी सोडले जात आहे. तर, भोजापूरसह आता आढळा धरणाचा ओव्हरफ्लो पूर्णतः थांबल्याने ओझरनजीकच्या बंधाऱ्यावरुन जायकवाडीकडे सुरु असलेल्या प्रवाहात मोठी घट झाली असून सध्या अवघा ४१ क्यूसेक पाणी वाहत आहे. मुळा खोऱ्यात मात्र शुक्रवारी चांगला पाऊस झाल्याने नदीचे पात्र पुन्हा फुगले असून धरणातील पाणीसाठ्यात पाव टीएमसीची भर पडली आहे.

यंदा मान्सूनपूर्वसह वेळेवर दाखल झालेल्या मोसमी पावसाने सद्यस्थितीत सर्वत्र समाधानाचे वातावरण निर्माण केले आहे. जिल्ह्यातही उत्तर व दक्षिण या दोन्ही भागात आत्तापर्यंत पावसाची स्थिती समाधानकारक आहे. अपवाद वगळता जिल्ह्यातील जवळजवळ सर्वच पाटबंधारे प्रकल्पांसह छोटी-मोठी धरणंही सुस्थितीत असल्याने आणि त्यातील समन्यायीची टांगती तलवारही यंदा जुलैतच हटल्याने जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. अशातच गेल्या आठवड्यापासून जिल्ह्यातील बहुतेक तालुक्यांमधून पाऊस गायब झाला. मात्र त्याचवेळी धरणांच्या पाणलोटात मात्र संततधार टिकून असल्याने मान्सूनच्या परतीची आशा कायम होती.

मात्र आठवडा उलटण्याच्या दिवशीच मान्सूनच्या ढगांनी पावसाचे आगार मानल्या जाणाऱ्या घाटघर, रतनवाडीच्या परिसरातूनही माघार घेतली असून बहुतेक ठिकाणी सकाळपासूनच सूर्यनारायणाने दर्शन देण्यास सुरुवात केली, दिवसभर यापेक्षा वेगळी स्थिती नव्हती. घाटघरमध्ये कोकणाच्या दिशेने **(पान ३ वर)**

HOTEL Super DIAMOND
पार्टीसाठी हॉल • प्रशस्त गार्डन • निसर्गरम्य वातावरण
• कॉन्फरन्स हॉल • फॅमिली डायनिंग • प्रशस्त पार्किंग
पत्ता - महात्मा फुले चौक, पावबाकी, संगमनेर मो. 9503925050, 7775052432
श्री. प्रमोद अशोकराव हिरे | चि. ऋतिक संतोषराव हिरे

अशी संधी एकदाच येते ! MONSOON DHAMAKA
₹1500 ते ₹5000 ची साडी फक्त ₹499/-
स्टॉक कधीही संपू शकतो आजच भेट द्या !
भंडारी सिल्क अँण्ड सारीज
मेनरोड कॉर्नर, संगमनेर, जि. अहिल्यानगर

ओम मयूर ज्वेलर्स
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीच्या स्वरुपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 । मो.: 93720 12044

चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ. नागरे हॉस्पिटल समोर, नवीन नगर रोड, संगमनेर
02425 - 221632, 224761, 7038170382
लहान मुलांसाठी कॅशलेस सुविधा उपलब्ध
बालरोग तज्ञ पूर्णवेळ उपलब्ध
डॉ.सौ. उज्वला जठार एम.बी.बी.एस.,डी.सी.एच. बालरोगतज्ज्ञ
Critical Care | Dialysis | C.T.Scan | Pathology Lab | Cashless Companies Available

काजळे ज्वेलर्स
मार्केट मधील सर्वात कमी भाव | सोने विमा संरक्षण उपलब्ध | सुवर्ण बचत भिशी उपलब्ध
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर 9601222777, 9615222777

भरपुर ऑफरसह नाविन्याने नटलेला...
कुर्तीज फेस्टीवल
मुंबई, अहमदाबाद, जयपुर, दिल्ली, कलकत्ता, लखनऊ, बँगलोर येथील उत्कृष्ट डिझाईनर्सने बनविलेल्या कुर्तीवर मिळवा
20 TO 50% OFF
भंडारी मेनरोड कॉर्नर, संगमनेर 02425 225719

सुविचार : वर्तमानकाळ हा भविष्यकाळ विकत घेत असतो.

# नव्या नेतृत्वापुढील आव्हाने

शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे यांची नियुक्ती करण्यात आल्याने या पक्षात खांदेपालट होण्याच्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. गेल्या काही महिन्यांपासून जयंत पाटील यांच्याऐवजी दुसर्या एखाद्या नेत्याची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली जाईल, अशी चर्चा होत होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वर्धापन दिन कार्यक्रमातसुद्धा जयंत पाटील यांनी पद सोडण्याचे सूतोवाच केले होते. त्यानंतर गेल्या काही दिवसांमध्ये जयंत पाटील यांनी राजीनामा दिला अशा बातम्यासुद्धा माध्यमांमध्ये फिरत होत्या. या बातम्यांमध्ये काही तथ्य नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेस नेत्यांकडून सांगितले जात असतानाच हा खांदेपालट करण्यात आला आहे. काहीच महिन्यांपूर्वी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती करून काँग्रेसनेसुद्धा आपल्या पक्षामध्ये बदल केले होते. आता राष्ट्रवादी काँग्रेसनेसुद्धा प्रदेशाध्यक्ष पद शशिकांत शिंदे यांच्यासारख्या फायर ब्रँड नेत्याकडे दिले आहे. जयंत पाटील गेली सात वर्षे या पदावर कार्यरत होते. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गट राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतरसुद्धा जयंत पाटील प्रदेशाध्यक्षपदी कायम होते. जयंत पाटील यांच्या राजकीय हालचालींबाबत नेहमीच उलटसुलट बातम्या प्रसिद्ध होत असल्या तरीसुद्धा त्यांनी पवार यांची साथ सोडली नाही. आता राष्ट्रवादीमध्ये हा प्रदेशाध्यक्ष पदाचा खांदेपालट होत असताना त्यांनी जे भाषण केले त्यामध्येसुद्धा आपण शेवटपर्यंत याच पक्षात राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. नवे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्यासमोर काय आव्हाने असतील याचे अप्रत्यक्ष सूतोवाच त्यांनी या भाषणामध्ये केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर शरद पवार यांचा गट कमकुवत झाला आहे असे वाटत असतानाच लोकसभा निवडणुकीमध्ये या पक्षाने चांगले यश मिळवले होते. पण विधानसभा निवडणुकीमध्ये मात्र अपयश आले होते. या पार्श्वभूमीवर आता लवकरच होणार्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हा पक्ष कसे काम करतो हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. शरद पवार यांचे कट्टर समर्थक आणि कार्यकर्ते असलेल्या शशिकांत शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून पवार यांचा एकनिष्ठ शिलेदार म्हणून काम केले आहे. सातारा जिल्हा शरद पवार यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. पण तो बालेकिल्लाच विधानसभा निवडणुकीमध्ये ढासळला असल्याने सातारा जिल्ह्यातीलच असलेल्या शशिकांत यांच्यासाठी तेसुद्धा एक आव्हान ठरणार आहे. ज्या सातारा जिल्ह्यामध्ये कधीच भाजपचे वर्चस्व नव्हते, त्या जिल्ह्यामध्ये आता शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस किंवा काँग्रेस यांचा एकही आमदार नाही. शशिकांत यांनासुद्धा विधानसभा निवडणुकीमध्ये आणि त्यापूर्वी लोकसभा निवडणुकीमध्येही पराभव पत्करावा लागला होता. याच पार्श्वभूमीवर आता शशिकांत शिंदे यांना आगामी कालावधीमध्ये पक्षाची धुरा सांभाळावी लागणार आहे. दोन जागांवरून भाजपने ज्या प्रकारे सत्तेपर्यंत मजल मारली होती त्या प्रकारे आपल्याला का शक्य नाही, असा सवाल जयंत पाटील यांनी आपल्या भाषणामध्ये विचारला होता. आपल्या पक्षाला पुन्हा चैतन्य देण्याची गरज असल्याचे सूचित केले होते. त्याचा विचारही शशिकांत यांना करावा लागणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासूनच हा पक्ष सतत सत्तेमध्ये राहिला आहे. काँग्रेसपासून वेगळा झालेल्या या पक्षाने निवडणुकीनंतर काँग्रेसशी युती करून महाराष्ट्रात सत्ता मिळवली होती आणि राखलीसुद्धा होती. नंतरच्या काळात या दोन्ही पक्षातील अनेक नेते भाजपामध्ये दाखल झाले. अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये झालेला उठावही पक्षाला धक्का देणारा ठरला. शरद पवार यांच्या एकमुखी नेतृत्वामुळे आणि त्यांच्या आजवरच्या कर्तृत्वामुळे पक्षाची आजही चर्चा असली, तरी भविष्यामध्ये पक्षाचे महत्त्व वाढवण्यासाठी बर्याच काही गोष्टी कराव्या लागणार आहेत आणि त्याची कल्पना शशिकांत यांनाही असणार आहे. पक्ष सत्तेवर असताना त्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष पद मिळवणे वेगळे आणि पक्ष विरोधी पक्ष म्हणून काम करत असताना किंवा कमकुवत परिस्थितीमध्ये कार्यरत असताना प्रदेशाध्यक्ष होणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत हे शशिकांत यांनाही माहीत आहे. म्हणूनच आगामी कालावधीमध्ये पक्षसंघटना बळकट करण्यावर आपण भर देणार आहोत याचे सूतोवाच त्यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस किंवा शिवसेना हे पक्ष कार्यकर्त्यांची फळी असणारे पक्ष मानले जातात. या कार्यकर्त्यांचा नेता जेव्हा अन्य पक्षात जातो तेव्हा ते कार्यकर्तेही त्या पक्षाचे कार्यकर्ते होतात. राष्ट्रवादी काँग्रेसमध्येसुद्धा गेल्या काही वर्षांमध्ये अशाच घडामोडी घडल्या आहेत. साहजिकच पुन्हा एकदा तळापासून कार्यकर्त्यांची फळी भक्कम करण्याचे काम शशिकांत यांना करावे लागणार आहे. लवकरच होणार्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने कार्यकर्त्यांची चाचपणी करणे शक्य होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला चांगले यश मिळवून देणे हे पहिले आव्हान शशिकांत यांच्यासमोर आहे. शरद पवार यांनी अत्यंत विश्वासाने शशिकांत यांच्याकडे ही महत्त्वाची जबाबदारी दिली असल्याने शरद पवार यांचा विश्वास सार्थ करण्याचे आव्हानही आता शशिकांत शिंदे यांना पेलावे लागेल.

**भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजे इस्रो ही संस्था गेल्या सात दशकांपासून भारताच्या विज्ञान, तंत्रज्ञान व स्वाभिमानाचे भक्कम प्रतीक ठरली आहे. उपग्रह प्रक्षेपणापासून ते चांद्रयान, मंगळयान व सौरयानापर्यंत अनेक स्वप्नांना तिने सत्यात उतरवले. आता या यशाच्या पायावर इस्रो एक नवे ध्येय पूर्ण करण्याच्या तयारीत आहे , ते म्हणजे भारतीय अंतराळ स्थानक. या स्वदेशी अंतराळ स्थानकाच्या निर्मितीमुळे भारत अंतराळ क्षेत्रात अधिक आत्मनिर्भर व जागतिक स्पर्धेसाठी सक्षम होईल. शुभांशु शुक्ल यांच्या यशस्वी आगमनानंतर भारताच्या अंतराळ संशोधनातील आशाअपेक्षा उंचावल्या आहेत.**

■ प्रा. विजया पंडित



# आता भारतीय अवकाशस्थानकाचे वेध

भारताच्या शुभांशु शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष स्थानकावर १८ दिवसांचा प्रवास पूर्ण केल्यानंतर अलीकडेच आनंदाने पृथ्वीवर पुनरागमन केले. हे केवळ वैयक्तिक यश नसून तो भारताच्या मानवी अंतरिक्ष मोहिमेच्या महत्त्वाकांक्षांना मूर्त स्वरूप मिळवून देणारा ऐतिहासिक टप्पा आहे. या यशामुळे भारतीय अंतराळ क्षेत्राच्या इतिहासात एक महत्त्वाचा मैलाचा दगड रोवला गेला आहे. भारताला मानवी अंतराळ उड्डाणाचा फारसा अनुभव नाही. त्यामुळे शुभांशु शुक्ला यांच्यासारख्या मोहिमा अधिक महत्त्वाच्या ठरतात. मानव अंतराळ प्रवास हे अत्यंत गुंतागुंतीचे क्षेत्र आहे. अनेक प्रगत राष्ट्रे यामध्ये अपयशी झाली आहेत. या पार्श्वभूमीवर शुभांशु शुक्लांची ही अंतराळसफर आणि त्यातील आंतरराष्ट्रीय अनुभव हा भारतासाठी अनमोल ठरेल. ही वाटचाल आता भारताच्या स्वदेशी मानवी अंतराळ मोहिमेसाठी (गगनयान) भक्कम आणि वैज्ञानिकदृष्ट्या पडताळलेला पाया निर्माण करणारी ठरली आहे. गगनयान मिशनबरोबरच भारत आपले स्वतःचे अंतराळस्थानक तयार करण्याच्या प्रयत्नात आहे.

सध्या अवकाशात आयएसएस आणि चीनचे अवकाश स्थानक काम करत आहे. या अवकाश स्थानकांच्या मदतीने अंतराळ संशोधनाला मोलाची चालना मिळाली आहे. स्थानकात मुक्कामास येणारे अंतराळवीर संशोधन कार्ये करत नवनवीन तथ्य उलगडत आहेत. येणाऱ्या काळात अवकाश संशोधनाची व्याप्ती आणखी वाढणार असून यात भारताच्या स्वतःच्या अवकाश स्थानकाची गरज मोठ्या प्रमाणावर आहे. यादृष्टीने नियोजन आणि तयारी केली जात आहे.

भारतासारखा विकसनशील देश हा आगामी दहा वर्षात स्वत:चे अवकाश स्थानक तयार करण्याची घाषणा करेल, याची कल्पनाही कोणी केली नव्हती. मात्र २३ ऑगस्ट २०२३ रोजी चांद्रयान-३ ला चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वीपणे उतरविणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला. चंद्रावर चांद्रयानचे सॉफ्ट लँडिंग झाल्यानंतर अवकाश स्थानकाबाबत केलेली घोषणा पाहून भारताच्या योजनेबाबत कोणाच्याही मनात शंका राहिली नाही.

नजिकच्या काळात भारत अवकाश स्थानक बनवेल, यात कोणाचेही दुमत नाही.

**तीन वर्षानंतर प्रक्षेपण**

भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) २०२८ पर्यंत पहिले आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानक प्रक्षेपित करण्याची घोषणा केली. यानुसार २०२८ मध्ये लाँच होणारे मॉड्यूल एक रोबोटिक मॉड्यूल असेल. म्हणजेच प्रयोग करण्याजोगा आणि परत आणण्याजोगा उपग्रह स्थापित करणे. मात्र मानवाला या अवकाश स्थानात जाण्यासाठी आणखी दहा वर्षे वाट पाहावी लागणार आहे.

**पहिल्या आयएसएसचे स्वरुप**

अवकाश स्थानक हे एक प्रकारे पृथ्वीच्या खालच्या कक्षेत मॉड्यूलर स्पेस स्टेशन किंवा राहण्याजोगा एक कृत्रिम उपग्रह असतो. जगातील पहिले अवकाश स्थानक म्हणून 'साल्युट वन' ला ओळखले जाते. १९ एप्रिल १९७१ रोजी तत्कालिन सोव्हियत रशियाने कझाकिस्तानच्या बायकोनूर कॉसमोड्रोमने सोडण्यात आले होते. हे स्थानक सुमारे २० टन वजनाचे अणि लाटण्याच्या आकाराचे होते. त्याची लांबी बारा मीटर आणि रुंदी ४.२५ मीटर होती. सिंगल डॉकिंग पोर्टच्या या अंतराळस्थानकाचा उद्देश अंतराळवीराच्या शरीरावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे आणि अवकाशातून पृथ्वीचे छायाचित्र टिपणे हा होता.

**सध्या दोन स्थानके सक्रिय**

आतापर्यंत पृथ्वीच्या खालच्या कक्षेत दोन स्थानके सक्रिय आहेत. पहिले आयएसएस अणि दुसरे चीनचे 'तियांगोंग' अवकाश स्थानक म्हणजेच टीएसएन होय. पहिले अवकाशस्थानक २० नोव्हेंबर १९९८ रोजी सोडले होते. अमेरिकी अवकाश संशोधन संस्था 'नासा'कडून आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकाचे कामकाज पाहिले जाते आणि ते एक बहुराष्ट्रीय सहकार्याने संचलित होणारे स्थानक आहे. यात पाच देशांच्या अवकाश संस्था सहभागी आहेत. यात अमेरिकेची नासा (नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन) रशियाची रोस्कोस्मोस, जपानची जेएएक्सए (जपान एरोस्पेस एक्स्प्लोरेशन एजन्सी), युरोपची ईएसए (युरोपीय स्पेस एजन्सी) आणि कॅनडाची सीएसए (कॅनाडियन स्पेस एजन्सी) यांचा समावेश आहे. या अंतराळ स्थानकामध्ये दोन बाथरुम, एक जीम आणि एक ३६० अंश दृश्य दाखविणारी खिडकी. या अवकाश स्थानकाची लांबी १०९ मीटर आहे. १९८४ आणि १९९३ या काळात या स्थानकाची निर्मिती करण्यात आली. २००० मध्ये या अवकाश स्थानकात जगातील वेगवेगळ्या देशांतील अंतराळवीरांनी राहण्यास सुरुवात केली. मुक्कामाच्या काळात अंतराळवीर अन्य ग्रहांचा अभ्यास करण्याबरोबरच विविध प्रयोग करत राहतात. आयएसएस हे पृथ्वीपासून ४०० किलोमीटर अंतरावरून पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालत आहे. त्याचा वेग २८ हजार किलोमीटर प्रती तास आहे. हे स्थानक केवळ ९० मिनिटातच पृथ्वीची प्रदक्षिणा पूर्ण करते.

चीनचे तियांगोग हे कायमस्वरुपी प्रस्थापित स्थानक असून त्याची लांबी ५५ मीटर किंवा १८० फूट आहे. यात तीन मोड्यूल आहेत. यातील कोअर मोड्यूलमध्ये सहा अंतराळीवर राहू शकतात. याशिवाय चीनच्या अवकाश स्थानकात ३८८४ क्युबिक फूट किंवा ११० क्युबिक मीटरचे दोन मॉड्यूल आहेत. चीनचे अवकाश स्थानक हे नासाच्या अवकाश स्थानकाच्या तुलनेत लहान आहे. ते पृथ्वीपासून ४५० किलोमीटर अंतरावर काम करते.

**भारताच्या अवकाश स्थानकाचे स्वरुप**

'इस्रो'ने आपल्या महत्त्वकांक्षी योजनेची घोषणा २०१९ मध्येच केली. येत्या दोन ते अडीच दशकांत भारताचे स्वत:चे अवकाशात स्थानक असेल असा विश्वास व्यक्त केला. संस्थेच्या मते, प्रस्तावित अवकाश स्थानकाच्या पहिल्या मॉड्यूलचे वजन आठ टन असेल आणि कालांतराने ते २० टनपर्यंत पोचेल. यात एकाचवेळी चार ते पाच अंतराळवीर सहा महिने राहू शकतात आणि त्याचे स्थान पृथ्वीच्या सर्वात खालच्या स्तरावर निश्चित करण्यात येईल. यास एलईओ (लोअर अर्थ ऑर्बिट) असे म्हणतात आणि ते साधारणपणे पृथ्वीपासून चारशे किलोमीटर अंतरावर असेल. गगनयान मिशनला देखील भारत पृथ्वीच्या लोअर ऑर्बिटमध्येच मूर्त रुप देणार आहे. याच ठिकाणी आपले अवकाश स्थानक असेल. भ हे स्थानक दीर्घकाळ टिकणारे असेल व त्याच्या साहाय्याने जैविक प्रयोग, मानवी शरीरावर शून्य गुरुत्वाकर्षणाचा परिणाम, अंतराळ शास्त्र, ऊर्जा संशोधन, यांत्रिकी क्षेत्रातील संशोधन आदी गोष्टी शक्य होतील.

भारतीय अंतराळ स्थानक हे पूर्णपणे स्वदेशी असेल व ते उभारण्यासाठी भारताला मोठ्या प्रमाणात निधी, संशोधन व वैज्ञानिक मनुष्यबळ यांची गरज भासेल. तसेच या प्रकल्पासाठी खाजगी उद्योग, शिक्षण संस्था व

**कव्हर स्टोरी**

संशोधन संस्था यांचा सहभाग देखील अत्यावश्यक ठरणार आहे. सध्याच्या अंदाजांनुसार २०३५ पर्यंत हे स्थानक कार्यान्वित होईल, असे मानले जाते.

इस्रोचे अंतराळ स्थानक हे गगनयान या महत्वाकांक्षी मानवी अंतराळ मोहिमेच्या पुढील टप्प्याशी जोडलेले आहे. गगनयानाच्या यशस्वी प्रयोगानंतर भारताकडे प्रशिक्षित अंतराळवीर, त्यांचे जीवनरक्षणासाठी आवश्यक तंत्रज्ञान, तसेच वैद्यकीय व मानसशास्त्रीय पायाभूत सुविधा तयार होतील. या अनुभवाच्या आधारेच अंतराळ स्थानकासाठी आवश्यक असलेले दीर्घकालीन जीवनसहायक तंत्रज्ञान, अंतराळात उर्जानिर्मितीचे तंत्र, जलशुद्धीकरण, वायुवीजन, अन्नपुरवठा यांसारख्या अत्यावश्यक बाबींची रूपरेषा निश्चित होईल.

अंतराळ स्थानकामुळे भारताला अनेक फायदे होतील. सर्वप्रथम, भारताला स्वतंत्रपणे अंतराळ संशोधन करता येईल. दुसरे म्हणजे भारतीय अंतराळवीरांना सातत्याने अंतराळात राहून प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. तिसरे म्हणजे जागतिक पातळीवर भारताच्या अंतराळ संशोधनातील दृष्टीकोनाला व संशोधन क्षमतेला मान्यता मिळेल. चौथे म्हणजे आज अमेरिका किंवा रशियावर अवलंबून असणाऱ्या विकसनशील देशांना अशा स्थानकाच्या माध्यमातून भारत सेवा देऊ शकतो.

या प्रकल्पाच्या यशासाठी इस्रोने आधीच काही महत्त्वाच्या तांत्रिक चाचण्या व विकासप्रक्रिया सुरू केल्या आहेत. यात कृत्रिम गुरुत्वाकर्षण निर्मिती, दीर्घकालीन उर्जास्रोत, जलचक्र व्यवस्थापन, मानवी शरीराच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेल्या संरचना, अंतराळातील विकिरणापासून संरक्षण यांसारख्या बाबींचा समावेश आहे.

अंतराळ स्थानकासाठी भारताला केवळ प्रक्षेपण यानांची क्षमता वाढवावी लागणार नाही, तर दीर्घकाळ टिकणाऱ्या व पुन्हा पुन्हा वापरता येणाऱ्या यानांची गरज भासेल. तसेच भारताला अंतराळात तांत्रिक दुरुस्ती करणारे रोबोटिक तंत्रज्ञान विकसित करावे लागेल. हे सगळे करताना जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी अत्यंत अचूक नियोजन, सातत्याने होणारे तांत्रिक सुधारणा व दीर्घकालीन धोरण आवश्यक आहे.

आज भारतीय अंतराळ स्थानक ही कल्पना जरी काहीशी दूर वाटत असली, तरी इस्रोच्या आतापर्यंतच्या यशाचा मागोवा घेतला, तर ही वाटचाल अशक्य वाटत नाही. चांद्रयान, मंगळयान, आदित्य एल-वन यासारख्या प्रकल्पांनी भारताने जगाला दाखवून दिले आहे की अत्यंत कमी खर्चातही उच्च दर्जाच्या यशस्वी मोहीमा राबविता येतात. त्यामुळे भारतीय अंतराळ स्थानक हे स्वप्न नक्कीच पूर्ण होईल, असा विश्वास बळावतो आहे.

भारतीय अंतराळ स्थानक हे केवळ वैज्ञानिक प्रयोगांचे केंद्र न राहता भविष्यात व्यापार, औद्योगिक संशोधन, अंतराळ पर्यटन व जागतिक सहकार्याचा नवा अध्याय लिहिणारे असेल. भारतासाठी ही गोष्ट केवळ सत्तेचा किंवा प्रतिष्ठेचा विषय नाही, तर विज्ञान, तंत्रज्ञान व मानवी उत्क्रांतीसाठी केलेली एक दूरदृष्टीपूर्ण गुंतवणूक असणार आहे. अंतराळाच्या या नव्या पर्वात भारताची उपस्थिती निश्चितच अधिक ठोस व निर्णायक ठरेल, यात शंका नाही.

**विश्लेषण**

# 'क्वाड' बैठकीचे उणेअधिक

**डोनाल्ड ट्रम्प पुन्हा व्हाईट हाऊसमध्ये परतल्यापासून, अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात स्पष्ट बदल दिसून येत आहेत. आर्थिक आणि सुरक्षा क्षेत्रातील अमेरिकेच्या प्राधान्यांमध्येही मोठा बदल झाला आहे. ट्रम्प यांची व्यापार-करांची (टॅरिफ) धोरणे आणि बदललेली सुरक्षा दिशा या दोन्हींनी क्वाड देशांशी असलेल्या अमेरिका-अन्वयी द्विपक्षीय संबंधांना जणू रीसेट-मोड मध्ये आणले आहे. या सर्व घडामोडी असूनही, क्वाड देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक या गटाच्या अजेंड्याला पुढे नेण्याच्या दृष्टीने फलदायी ठरली. बैठकीच्या शेवटी जारी झालेल्या संयुक्त निवेदनात समुद्री व आंतरराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक समृद्धी व संरक्षण, उदयोन्मुख महत्त्वाच्या तंत्रज्ञानांचा विकास आणि आपत्कालीन मानवी मदत या चार मुख्य क्षेत्रांवर भर देण्यात आला ह्नअसून ते या गटाचा मार्गदर्शक अजेंडा ठरवतील.**

अलीकडेच अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी वॉशिंग्टनमध्ये क्वाड देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. यावर्षी ही क्वाड परराष्ट्र मंत्र्यांची दुसरी बैठक होती. पहिली बैठक जानेवारीत वॉशिंग्टनमध्येच झाली होती. त्यावेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेची सत्तेची सूत्रे नव्याने हातात घेतली होती. दुसरी बैठक अनेक घटनांच्या पार्श्वभूमीवर पार पडली. त्यांचा लसावि काढल्यास अमेरिकेची जपान, ऑस्ट्रेलिया आणि भारत या आपल्या तीन घनिष्ट मित्र देशांसोबत असणाऱ्या संबंधांमधील दरी मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसत आहे.

डोनाल्ड ट्रम्प पुन्हा व्हाईट हाऊसमध्ये परतल्यापासून, अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात स्पष्ट बदल दिसून येत आहेत. आर्थिक आणि सुरक्षा क्षेत्रातील अमेरिकेच्या प्राधान्यांमध्येही मोठा बदल झाला आहे. ट्रम्प यांची व्यापार-करांची (टॅरिफ) धोरणे आणि बदललेली सुरक्षा दिशा या दोन्हींनी क्वाड देशांशी असलेल्या अमेरिका-अन्वयी द्विपक्षीय संबंधांना जणू रीसेट-मोड मध्ये आणले आहे. चालू वर्षाच्या सुरुवातीस अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि जपानचे पंतप्रधान इशिबा यांच्यात व्हाईट हाऊसमधील बैठकीत सकारात्मक वातावरणात चर्चा सुरू झाली होती. परंतु सध्याच्या घडामोडी सूचित करतात की त्या संबंधांमधील सौहार्द आता राहिलेला नाही. याचे ताजे उदाहरण म्हणजे नुकतेच झालेले नाटो शिखर संमेलन. या संमेलनाला जपानचे पंतप्रधान इशिबा अनुपस्थित होते. या गैरहजेरीतून त्यांनी मित्र देशांकडून संरक्षण खर्च वाढवण्याचा अमेरिकेचा आग्रह आपणास मान्य नसल्याचे त्यांनी दाखवून दिले. अशाच प्रकारे, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील संबंधांमध्येही तणाव दिसून येत आहे, विशेषतः व्हाईट हाऊसने औकस (ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंगडम व अमेरिका) गटाचा आढावा घेण्याचे ठरवल्यानंतर हा तणाव प्रत्यक्ष रुपाने समोर आला असे म्हणण्यास जागा तयार झाली आहे. या छोट्या गटाचा उद्देश ऑस्ट्रेलियन नौदलासाठी अण्वस्त्रसज्ज पाणबुडींची सोय करणे हा आहे. व्हाईट हाऊसला या गटाचे उद्दिष्ट ट्रम्प यांच्या अमेरिका फर्स्ट या धोरणाशी सुसंगत आहे की नाही हे पहावयाचे आहे. या आढाव्याचे कुठलेही नकारात्मक निष्कर्ष केवळ ऑस्ट्रेलिया-अमेरिका संबंधांवर परिणाम करू शकतात. इतकेच नव्हे तर हिंद-प्रशांत क्षेत्रातील समुद्री सुरक्षेच्या आराखड्यावरही त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो.

त्याचप्रमाणे, ऑपरेशन सिंदूर दरम्यान झालेल्या युद्धविरामासंदर्भात भारत आणि पाकिस्तान यांच्यात ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याचा दावा केल्यानंतर भारत-अमेरिका संबंधांत अस्वस्थता निर्माण झाली आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारात असमतोल असल्याच्या चर्चाही अधूनमधून होताहेत. यामुळे हे झपाट्याने पुढे जात असलेले द्विपक्षीय संबंधही अनिश्चिततेच्या सावटाखाली येतात. कारण ट्रम्प आपल्या परराष्ट्रधोरणातील प्राधान्यक्रम उलटवत-पलटवत आहेत. त्यामुळे क्वाडलाही आपली प्राथमिकतेंची यादी नव्याने ठरवावी लागेल हे स्वाभाविक आहे.

या सर्व घडामोडी असूनही, क्वाड देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक या गटाच्या अजेंड्याला पुढे नेण्याच्या दृष्टीने फलदायी ठरली. बैठकीच्या शेवटी जारी झालेल्या संयुक्त निवेदनात चार मुख्य क्षेत्रांवर भर देण्यात आला ह्नअसून ते या गटाचा मार्गदर्शक अजेंडा ठरवतील. ही चार क्षेत्रे म्हणजे: समुद्री व आंतरराष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक समृद्धी व संरक्षण, उदयोन्मुख महत्त्वाच्या तंत्रज्ञानांचा विकास आणि आपत्कालीन मानवी मदत.

विशेष म्हणजे, या बैठकीत क्वाड क्रिटिकल मिनरल्स इनिशिएटिव्ह देखील सुरू करण्यात आले ह्नअसून त्याचा उद्देश महत्त्वपूर्ण खनिजांच्या पुरवठा साखळीला विविधतेने समृद्ध करणे व ती सुरक्षित ठेवणे हा आहे.

हिंद-प्रशांत क्षेत्राच्या अफाट व्याप्तीच्या पार्श्वभूमीवर, क्वाड हे आसियान, आयओआरए व पॅसिफिक आयलंड फोरमसारख्या प्रादेशिक संघटनांबरोबर सातत्याने सहकार्य करीत आहे. या बैठकीत अशा अनेक घोषणा झाल्या ज्यामुळे या चारही मुख्य क्षेत्रांतील सहकार्याच्या शक्यता अधिक बळकट होतील. विशेष म्हणजे क्वाड क्रिटिकल मिनरल्स इनिशिएटिव्ह ही योजना पुरवठा साखळीला केवळ बळकटच करणार नाही, तर सामूहिक धोरणात्मक स्वायत्ततेसाठीही महत्वाची ठरेल.

दहशतवादासंदर्भातील ठाम भूमिका : जगभरातील अस्थिर घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या गटाने पूर्व व दक्षिण चीन समुद्र क्षेत्रांतील चीनच्या वाढत्या आक्रमकतेबाबत चिंता व्यक्त केली. यामध्ये चीनचे नाव थेट घेतले गेले नसले तरी क्वाडच्या संघटनेच्या भात्यातून हा बाण सोडला जाणे याला वेगळे महत्त्व आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या गटाने जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा उल्लेख करत, हिंसक अतिरेकी विचारसरणीचा उघडपणे निषेध केला. ही भारतासाठी निश्चितच दिलासादायक बाब ठरते. याचे कारण अलीकडेच पार पडलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या बैठकीत संयुक्त निवेदनात पहलगाम हल्ल्याचा उल्लेख नव्हता. यामुळे त्या गटाच्या दहशतवादविरोधी बांधिलकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. या अस्थिरतेच्या आणि मतभेदांच्या पार्श्वभूमीवरही, क्वाड परराष्ट्र मंत्र्यांची ही बैठक हिंद-प्रशांत क्षेत्रात नियमाधिष्ठित व्यवस्था प्रस्थापित करण्यावरील गटाची कटिबद्धता पुन्हा अधोरेखित करण्यात यशस्वी ठरली. क्वाड नेत्यांची पुढील शिखर बैठक याच वर्षी भारतात होणार आहे. जगाच्या विविध भागांत सुरू असलेल्या युद्धांमुळे व तणावामुळे हिंद-प्रशांत क्षेत्रात अस्थिरतेचा धोका सातत्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत मतभेद असूनही क्वाडची गरज आणि उपयुक्तता कायम असल्याचे चित्र आहे.

**- हर्ष व्ही. पंत,**
**उपाध्यक्ष, ओआरएफ**

# पन्हाळगड-पावनखिंड मोहिमेस शिवभक्तांचा प्रतिसाद

## इल्हे, शेळके यांचा राज्यस्तरीय शिवराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



शिवराष्ट्र हायकर्स महाराष्ट्र आयोजित पन्हाळगड ते पावनखिंड ही ३३ वी साहसी मोहीम नुकतीच पार पडली. याच काळात नरवीर शिवा काशीद आणि बाजीप्रभू देशपांडे यांचा स्मृतिदिन असल्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून मोठ्या संख्येने तरुण शिवभक्त सहभागी झाले होते. यावेळी सुखदेव इल्हे आणि संतोष शेळके यांचा राज्यस्तरीय शिवराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला.

या मोहिमेत संगमनेर परिसरातून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी ७० शिवभक्त तर राज्यभरातून साडेपाचशे शिवप्रेमी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. पन्हाळ्यावरील नरवीर शिवा काशीद आणि बाजीप्रभूंच्या पुतळ्यांचे पूजन करून या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर, खासदार धर्यशील माने, उपमुख्यमंत्री वैद्यकीय कक्ष प्रमुख मंगेश चिवटे, शिवराष्ट्र संस्थापक प्रशांत साळुंके, शिव व्याख्याते प्रा. दिपक कर्पे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. पाहुण्यांनी मसाईच्या पठारावर येऊन मोहिमेतील शिवभक्तांच्या अनेक समस्या जाणून घेतल्या.

खोतवाडीतील पहिल्या मुक्कामी शिवराष्ट्र निर्मित पावनखिंड हा लघुपट दाखविण्यात आला. या ठिकाणी शिवव्याख्याते प्रा. दिपक कर्पे यांचे पावनखिंडीचा इतिहास उलगडणारे प्रेरणादायी व्याख्यान झाले. महाराष्ट्रातील शिवप्रेमी यांनी मोहिमेत सहभाग नोंदवत डोंगरद-या, जंगल, ओढे नाल्यातील अत्यंत खडतर प्रवास अनुभवला.

पांढरपाणी येथुन शिवरायांच्या पालखीची मिरवणूक मोठ्या उत्साहाने पावनखिंड येथे आणण्यात आली. यावेळी नरवीर रायाजी बदलांचे वंशज अनिकेत बांदल सपत्नीक उपस्थित होते. त्यांनी अनवाणी पावलांनी शिवपालखीला खांदा दिला.

पावनखिंडीतील धारातीर्थावर पूजन करण्यात आले. या प्रसंगी पावनखिंड मोहिमेतील सातत्यपूर्ण सहभागाबद्दल शिवकार्यातून सामाजिक योगदानाबद्दल संगमनेरच्या संतोष शेळके आणि सुखदेव इल्हे यांना राज्यस्तरीय शिवराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

तसेच युवाव्याख्याते भूपाल शेळके यांचे पावनखिंड परिसराचा इतिहास आणि भूगोल यांची योग्य सांगड घालणारे प्रेरणादायी व्याख्यान झाले. याप्रसंगी आधारचे समन्वयक डॉ. महादेव अरगडे, प्राचार्य बाळासाहेब आहेर, ॲड. महेश थोरात, प्रा. सोमनाथ गडाख, सागर कोळगे, पंढरीनाथ घुले, भाऊसाहेब नागरे, गोरक्ष हासे, पोलीस पाटील दत्तू इल्हे, आबा फटांगरे, डॉ. रवी साबळे, सुभाष घनदाट यांचेसह शेकडो शिवभक्त उपस्थित होते. सूत्रसंचालन नंदकिशोर राहणे यांनी केले.

# शॉर्ट सर्किट मुळे जोर्वेत ऊस पेटला!

## लाखो रुपयांचे शेतकऱ्याचे नुकसान; भरपाई देण्याची मागणी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथे एका शेतकऱ्याच्या ऊसाला शॉर्ट सर्किटमुळे आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले. त्यामुळे या शेतकऱ्याला तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी जोर्वेच्या ग्रामस्थांनी केली आहे.

तालुक्यातील जोर्वे येथील शेतकरी विठ्ठल नानासाहेब काकड यांचे जोर्वे शिवारात गट नंबर ३५३/१ हे एक हेक्टर तीन आर क्षेत्र आहे. या संपूर्ण क्षेत्रात विठ्ठल काकड यांनी २६५ जातीच्या आडसाली उसाची लागवड केली होती. हा ऊस येत्या गळीत हंगामाला कारखान्याला जाणार होता. मात्र शुक्रवारी दुपारी ३ वाजेच्या सुमारास काकड यांच्या या क्षेत्राजवळील बांधावर असणाऱ्या महावितरणच्या ट्रांसफार्मरचे शॉर्टसर्किट होऊन त्याच्या ठिणग्या ट्रांसफार्मर जवळ असणाऱ्या गवतावर पडून शेजारी असणाऱ्या गळिताला जाणाऱ्या उसाने पेट घेतला. याच वेळी जोराचा वारा असल्याने क्षणार्धात आगीने रौद्ररूप धारण केले. आगीची माहिती समजताच परिसरातील शेतकऱ्यांनी काकड यांच्या शेताकडे धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान शेतकरी विठ्ठल काकड यांनी तात्काळ सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कारखान्यावर घडलेल्या घटनेची माहिती दिल्यावर तात्काळ कारखान्याच्या अग्निशमन बंबही घटनास्थळी दाखल झाला. मात्र तोपर्यंत परिसरातील शेतकऱ्यांना ऊस विझवण्यात यश आले. मात्र या आगीत एक हेक्टर तीन आर पैकी तब्बल ४० गुंठे उसाच्या खोडक्या झाल्या. त्यामुळे शेतकरी विठ्ठल नानासाहेब काकड यांचे तब्बल दोन लाखांचे नुकसान झाले असून त्यांना तातडीने महावितरण कंपनीने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी जोर्वे आणि परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

नायक ANCHOR

# शेतकऱ्यांनी शेतीमाल बाजार समितीतच विकावा : सभापती खेमनर

**नायक वृत्तसेवा, साकुर**



संगमनेर तालुक्याच्या साकुर पठार भागात सध्या शेतकरी मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारची पिके घेत असून बाहेरील व्यापारी शेतकऱ्यांना कमी भाव देवुन गैरफायदा घेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी कष्टाने पिकवलेला आपला शेतीमाल बाजार समितीतच विकावा असे आवाहन संगमनेर बाजार समितीचे सभापती शंकर खेमनर यांनी केले आहे.

बाहेरील व्यापाऱ्यांच्या अमिषाला संगमनेर तालुक्यातील शेतकरी बळी पडतात. व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याच्या घटना समोर असताना सुद्धा काही अनोळखी व्यापारी थेट शेतकऱ्यांना जास्त भावाचे आमिष दाखवून माल घेवुन फसवणूक करण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतीमाल हा बाजार समितीतच विकावा, जे ने करून फसवणूक होणार नाही.

# पोलिसांना शिवीगाळ करत धक्काबुक्की

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

सुरू असणारी भांडणे सोडवण्यासाठी गेलेल्या पोलिसांना शिवीगाळ करत धक्काबुक्की केल्याची घटना तालुक्यातील सोनोशी येथे घडली. याप्रकरणी पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवाजी डमाळे यांनी तालुका पोलिसात फिर्याद दिल्यावरून पोलिसांनी पाच आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

शनिवार दि.१९ जुलै रोजी तालुक्यातील सोनोशी येथे राजेंद्र तुकाराम सानप, नवनाथ सानप, राजेंद्र सानप यांच्यासह दोन अनोळखी इसम आपापसात भांडणे करत होते. ती भांडणे सोडवण्यासाठी फिर्यादी पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवाजी सोपान डमाळे आणि साक्षीदार गेले असता वरील आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत धक्काबुक्की केली आणि सरकारी कामात अडथळा आणला. याप्रकरणी अधिक तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल आरोडे करत आहेत.

# नसीम शब्बीर पठाण यांचे निधन

**नायक वृत्तसेवा, साकुर**



संगमनेर तालुक्यातील साकुर येथील सामाजिक कार्यकर्ते आणि व्यावसायिक शब्बीर चांद पठाण यांच्या पत्नी नसीम बानो (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने दुःख द निधन झाले. नसीम शब्बीर पठाण यांच्या अचानक निधनाने पठाण परिवाराला व त्यांच्या नातेवाईकांना धक्का बसला आहे. त्यांच्या पश्चात पती, मुले असा मोठा परिवार आहे.

## पान १ वरुन

**वारंवार गुन्हा करणाऱ्या कसायांची आता खैर नाही!**

कत्तलखान्यांवर छापे घातले होते.

राज्यात हा कायदा लागू झाल्यानंतरची सर्वात मोठी कारवाई ठरलेल्या या छाप्यात पोलिसांनी तब्बल ३१ टन कांपलेल्या गोवंशाच्या मांसासह ७१ जिवंत जनावरे, अनेक चारचाकी माल-वाहतूक वाहने आणि अन्य असा सव्वा कोटी रुपयांचा मुद्देमालही जप्त केला होता. राज्यात गाजलेल्या या कारवाईनंतर संगमनेरातील हिंदूत्ववाद्यांनी कत्तलखान्यांविरोधात आंदोलनही उभारल्याने संगमनेरातील सामाजिक सौहार्द धोक्यात आले होते. त्यातून मोठा सामाजिक दबाव निर्माण झाल्याने पोलिसांनी पालिकेच्या मदतीने कत्तलखान्यांचा परिसर म्हणून कुप्रसिद्ध ठरलेल्या ‘त्या’ ठिकाणावर ‘जेसीबी’ कारवाईचा बनाव केला, कालांतराने तो उघडही झाला.

या कारवाईनंतर संगमनेरातील कत्तलखान्यांचा आवाका जगासमोर आल्याने त्याचे समूळ उच्चाटण होईल असाच बहुतेकांचा अंदाज होता, मात्र तो सपशेल फोल ठरला. या उद्योगातून दररोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचे व गायीच्या रक्ताचे ओघळ थेट जिल्हा मुख्यालयापासून अगदी काही पक्ष, संघटनांचे स्थानिक पदाधिकारी आणि पत्रकारांपर्यंतही पोहोचत असल्याचे त्यातील एका कसायाच्या कत्तलखान्यात सापडलेल्या वेगवेगळ्या रंगाच्या तीन डायऱ्यांमधून ठळकपणे, अगदी आकड्यांसह समोर आले होते. त्या आधारे पुढील तपास झाला असता तर कदाचित संगमनेरच्या कत्तलखान्यांना खणत्या लागल्या असत्या. मात्र या उद्योगातून मिळणाऱ्या प्रचंड पैशांवर यंत्रणांचेही हात बरबटलेले असल्याने कायदा अस्तित्वात आल्यापासून शेकडों कारवाया, लाखों किलो गोवंशाचे मांस, हजारों जिवंत जनावरे, कोट्यवधीची वाहने आणि शेकडों कसायांवर गुन्हे दाखल होवूनही संगमनेरातील कत्तलखाने कधीही बंद होवू शकले नाहीत.

त्यावरुनच संगमनेरचे आमदार अमोल खताळ यांनी थेट विधीमंडळाच्या सभागृहात आवाज उठवताना संगमनेरातील बेकायदा कत्तलखान्यांमुळे शहराचे सामाजिक सौहार्द धोक्यात आल्याची गंभीर बाब शासनासमोर मांडली होती. या उद्योगाला स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्याचा थेट आरोपही त्यांनी केला होता. त्यावर मुख्यमंत्र्यांनी स्वतः निवेदन करताना संगमनेरातील कत्तलखान्यांवर पोलिसांनी कठोर कारवाई केल्याचे व महाराष्ट्र झोपडपट्टी कायद्यान्वये (एमपीडीए) एक कारवाई झाल्याची माहिती सभागृहाला दिली. सदरची माहिती खोटी आणि दिशाभूल करणारी असल्याची बाबही आमदार खताळ यांनी लक्षात आणून दिली. त्यावर सविस्तर उत्तर देताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सध्याच्या गोवंश हत्याबंदी कायद्यात पाच वर्षाच्या शिक्षेची तरतूद असल्याने आरोपीला तत्काळ जामीन मिळत असल्याने या कायद्याचा प्रभाव कमी झाल्याचे मान्य केले.

राज्य सरकार गोवंशाच्या बेकायदा कत्तलीबाबत गंभीर असल्याचे नमूद करताना त्यांनी सध्याच्या कायद्यात काही तरतुदींचा समावेश करण्याचा विचार सुरु असल्याचे संकेत देताना कायद्यातील शिक्षेची कठोरता वाढवताना वारंवार गुन्ह्यात सापडणाऱ्यांना दहावर्ष कारावासाच्या शिक्षेची तरतूद करण्याचा सरकारचा विचार त्यांनी मांडला. कायद्यात अशाप्रकरची तरतूद आल्यास छाप्यानंतर पूर्वइतिहास पाहून पोलीस कसायाला अटक करुन कारागृहात टाकू शकतील. सध्याच्या कायद्यात अशा गुन्ह्यात पाच वर्षांची सर्वोच्च शिक्षा असल्याने कारवाईनंतर आरोपीला थेट अटक करता येत नाही. त्याचा फायदा घेत काहीजण वारंवार अशाप्रकारचा उद्योग करीत असल्याचे वेळोवेळी समोर आले आहे. कायद्यातील बदलाने अशाप्रकारांना काही प्रमाणात आळा बसण्याची शक्यता आहे.

**लाभक्षेत्रासह पाणलोटातूनही पाऊस गायब!**

आलेल्या एकद् दुसऱ्या ढगांच्या पूंजक्यातून अधुनमधून कोसळणाऱ्या आषाढसरी वगळता शुक्रवारी पाणलोटात पावसाने उघडीप दिली. त्यामुळे धरणांमध्ये होत असलेली पाण्याची आवकही रोडवली, मात्र भंडारदऱ्यातून सध्या सुरु असलेला ८४० क्यूसेकचा विसर्ग कायम ठेवला गेल्याने गेल्या २४ तासांत धरणाच्या पाणीसाठ्यात किंचित घट झाली आहे.

आढळा व भोजापूर धरणाच्या पाणलोटातील पाऊस यापूर्वीच थांबल्याने धरणावरुन सुरु असलेला ओव्हरफ्लो आता जवळजवळ थांबला आहे, त्यामुळे आढळा व म्हाळुंगी या दोन्ही नद्या आटल्याने ओझर बंधाऱ्यावरुन जायकवाडीच्या दिशेने वाहणाऱ्या पाण्यात मोठी घट होवून आज सकाळी हा प्रवाह अवघ्या ४१ क्यूसेकवर आला आहे. एकीकडे भंडारदरा व निळवंडे धरणाच्या पाणलोटातून पाऊस गायब झाला असतानाच शुक्रवारी मुळा खोऱ्यातील हरिश्चंद्रगडाच्या माथ्यावर मात्र जोरदार आषाढसरी कोसळल्या. त्यामुळे कोतुळनजीकचे मुळापात्र दुपटीने अधिक फुगले असून आज सकाळी तेथील प्रवाह पाच हजार क्यूसेकहून अधिक झाला होता.

मागील चोवीस तासांत घाटघर येथे ९ मि.मी व रतनवाडीत तीन मि.मी पाऊस वगळता जिल्ह्यात अन्यत्र कोठेही पावसाची नोंद झालेली नाही. आज सकाळी सहा वाजता मुळा धरणाचा पाणीसाठा १८ हजार ५४८ दशलक्ष घनफूट (७१.३४ टक्के), भंडारदरा ८ हजार ३७० दशलक्ष घनफूट (७५.८३ टक्के) व निळवंडे धरणाचा पाणीसाठा ७ हजार २८० दशलक्ष घनफूट (८७.५० टक्के) इतका होता.


जाहिरात छोटी..... प्रतिसाद मोठा.

**विकणे आहे**
संगमनेरमध्ये नवीन नगर रोड येथील तुलसी प्लाझा कॉम्प्लेक्स, इथापे हॉस्पिटल जवळ, ३ गाळे एकूण १०३० स्के. फुट व १ गाळा ८० स्के. फुट असे एकूण १११० स्के. फुट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
मो-९४२२२२३१९४, ७०२०६३७३५३

**सेल्समन पाहिजेत**
दुकान कामासाठी, लेडीज, जेंट्स पाहिजेत. अनुभुवीस जास्त प्राधान्य. आकर्षित पगार दिला जाईल.
भंडारी सिल्क ॲण्ड सारीज संगमनेर
7666805819

**गाळा भाड्याने देणे आहे**
वंदन मेन्स पार्लर मेन रोड संगमनेर 13/10, R/c बांधकाम असलेला गाळा त्वरित भाड्याने देणे आहे.
संपर्क
9422238616
9850044487

**सेल्समन पाहिजेत**
जेन्ट्स सेल्समन - 2 जागा
लेडीज सेल्समन - 3 जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर- 2 जागा
सारिका ड्रेसेस
बाजारपेठ, संगमनेर
9822358335

जाहिरातीसाठी संपर्क-सचिन
9767007746


जा.क्र. संगमनेर दूध बोर्ड / जाहीर नोटीस / 1064/2025-26 दि. 18/07/2025

**जाहीर नोटीस**

संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या., संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण मतदार संघ प्रतिनिधी या प्रवर्गातील / मतदार संघातील संचालक/संचालकांच्या 1 (एक) जागा निवडीकरीता मा. सचिव, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दिनांक 17/07/2025 रोजीच्या आदेशान्वये मा.श्री. संतोष कोरे, उपनिबंधक सहकारी संस्था, संगमनेर तथा अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 25.07.2025 रोजी सकाळी 11.00 वाजता संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्या., संगमनेर या संघाच्या कार्यालियामध्ये संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत असुन नैमित्तिकपणे रिक्त झालेल्या पद निवडीसाठी निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

(मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने)

दिनांक :- 18/07/2025
ठिकाण :- संगमनेर

**कार्यकारी संचालक**
संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित, संगमनेर, जि. अहिल्यानगर









‘बांधिलकी जनहिताची नायक’ हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

# पवार यांच्या कुटुंबीयांना दहा लाखांची मदत!

## आ. खताळ यांच्या पुढाकाराने मदतीचा धनादेश घरपोहच

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेर येथील गटार दुर्घटना प्रकरणातील मयत अतुल रतन पवार या तरुणाच्या आई-वडिलांना आ.अमोल खताळ यांच्या सूचनेनंतर संगमनेर नगरपालिकेचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी दहा लाख रुपयांचा धनादेश घरपोहच केला.

शहरातील कोल्हेवाडी रोड वर नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलजवळ भूमिगत गटारीचे काम सुरू असताना गुरुवार दि. १० जुलै रोजी गटारीच्या चेंबरमधील मैला काढत असताना अतुल रतन पवार या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.या घटनेनंतर आ. अमोल खताळ यांनी पवार कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले होते. त्याच वेळी त्यांनी शासनाच्या वतीने ३० लाख रुपयांची मदत देणार असल्याचे लेखी पत्र दिले होते.



आमदार खताळ यांच्या सूचनेनुसार संगमनेर नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक रामदास कोकरे यांनी तत्काळ कार्यवाही करत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून १० लाख रुपयांचा मदतीचा धनादेश मयत पवार यांच्या कुटुंबीयांच्या घरी जाऊन त्यांच्या आईवडिलांकडे सुपूर्त केला. ही मदत मिळाल्याने पवार कुटुंबीयांनी आ. अमोल खताळ व नगरपरिषद प्रशासनाचे आभार मानले असून, उर्वरित रकमेची सुद्धा लवकरच कार्यवाही पूर्ण करणार असल्याचे मुख्याधिकारी कोकरे यांनी सांगितले

■ शहरातील संजय गांधी नगर मधील मयत अतुल रतन पवार यांच्या कुटुंबियांना ३० लाख रुपयांपैकी पहिल्या टप्प्यातील १० लाख रुपयांचा धनादेश मुख्याधिकारी रामदास कोकरे यांच्या कडून घरपोहच देण्यात आला. उर्वरित रक्कम लवकरच कुटुंबियांना देण्यात येणार आहे. राज्यातील महायुतीचे सरकार हे जाहिरातबाजी करणारे नव्हे तर काम करणारे सरकार असल्याचे आ.खताळ यांनी सांगून अतुल पवार याला वाचवण्यासाठी गेलेल्या रियाज पिंजारी यांच्या कुटुंबालाही मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळावी यासाठी शुक्रवारी खताळ यांनी सभागृहात मागणी करत सरकारचे लक्ष वेधले.

# ज्ञान प्राप्तीसाठी जीवनात गुरुचे स्थान अटळ : डॉ. लोखंडे



**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**

शालेय जीवनात शिक्षक हे विद्यार्थ्यांना नीतिमूल्ये व वेगवेगळ्या शालेय विषयांच्या अभ्यासाचे ज्ञानं देतात, गुरु हे जीवनाला योग्य दिशा देत चांगला मार्ग दाखवतात. विज्ञान युगात देखील गुरूंचे आपल्या जीवनात स्थान अटळ असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापक डॉ. अनिल लोखंडे यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथील श्री रामेश्वर विद्यालयामध्ये व्यासपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली त्यावेळी मुख्याध्यापक डॉ. लोखंडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य भास्कर पाटोळे होते. तर व्यासपीठावर सेवानिवृत्त प्रा. बबन शेरमाळे, ज्येष्ठ शिक्षक एच. टी. कानगुडे, सुरेश अनाप, अतुल मुंतोडे, किशोर पवार, पी. एस. तनपुरे, शालिग्राम गायकवाड यांच्यासह विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी कोमल गुळवे स्वामिनी पावडे यांनी केले तर प्रस्ताविक सायली बेलकर हिने केले, बाकीया शेख हिने आभार मानले.

# लोकशाहीचे धडे थेट तिसरीत!

## ... आणि विद्यार्थ्यांनीच बनवले स्वतःचे सरकार

**नायक वृत्तसेवा, श्रीरामपूर**

तालुक्यातील अशोकनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एका आगळ्यावेगळ्या उपक्रमात इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी लोकशाहीच्या मूलतत्त्वांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. वर्गशिक्षिका स्वाती पटारे - निमसे यांच्या संकल्पनेतून व मुख्याध्यापक पांडुरंग पटारे यांच्या मार्गदर्शनाखाली तिसरीच्या वर्गात ६ मंत्र्यांच्या निवडीसाठी निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली.

निवडणुकीसाठी विद्यार्थ्यांना प्रथम संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. 'व्होटिंग ॲप'चा वापर करून मतदानाची आधुनिक पद्धत शिकवण्यात आली. अर्ज भरण्यापासून ते निकाल जाहीर होईपर्यंत प्रत्येक टप्प्यात विद्यार्थ्यांना सक्रीय सहभाग दिला गेला. उमेदवारीसाठी १८ अर्ज प्राप्त झाले. त्यानंतर घेण्यात आलेल्या परीक्षेत ५० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या ९ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली.

निकाल जाहीर होताच विजयी उमेदवारांचा गुलाल, फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. काही उमेदवार थोड्या मतांनी पराभूत झाल्यामुळे त्यांना अश्रू अनावर झाले, हेही दृश्य विद्यार्थ्यांना निवडणुकीच्या वास्तवाचा अनुभव देणारे ठरले. १६ जुलै रोजी मुख्यमंत्र्यापासून अभ्यास मंत्र्यापर्यंत पदभार वितरण व शपथविधी पार पडला. विशेष म्हणजे विजयी उमेदवारांनी दुसऱ्याच दिवशी आभार सभेचे आयोजन करून सहविद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटपही केले.

# शुक्रवार पासून थोरात कारखाना कार्यस्थळावर अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर अमृतेश्वर मंदिर प्रांगणात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि.२५ जुलै ते शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर व सांस्कृतिक मंडळाचे कार्याध्यक्ष रामदास तांबडे यांनी दिली.

वै.स्वानंद सुखनिवासी गुरुवर्य रामभाऊ महाराज गावडे यांचे प्रेरणेने, गुरुवर्य कलामाई यांचे कृपाशिर्वादाने व गोविंद महाराज करंजकर तसेच चंद्रलेखा काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली सलग ४० व्या वर्षी या सप्ताहाचे आयोजन होत आहे.




या सप्ताहाची घटस्थापना शुक्रवार दि.२५ जुलै रोजी सकाळी ९ वा पांडुरंग घुले व त्यांच्या पत्नी प्रतिभा पांडुरंग घुले यांच्या शुभहस्ते होणार आहे. या सप्ताहात सकाळी ५ ते ६ काकडा भजन, सकाळी ८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण, सकाळी ११ ते १२ गाथाभजन, सायंकाळी ४.३० ते ५.३० सामुदायिक हरिपाठ, सायं.५.३० ते ६.३० ज्ञानेश्वरी प्रवचन,सायं ७ ते ९ हरिकिर्तन नंतर हरिजागर होणार आहे.

यामध्ये शुक्रवार दि.२५ जुलै ते शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ पर्यंत अरुण महाराज फरगडे संपूर्ण सप्ताह काळात दररोज ज्ञानेश्वरी अध्याय प्रवचन सेवा देणार आहे. शुक्रवार दि.२५ जुलै रोजी सुनील महाराज मंगळापुरकर, शनिवार दि.२६ जुलै रोजी अरुण महाराज फरगडे, रविवार दि.२७ जगन्नाथ महाराज पाटील, सोमवार दि.२८ राजेंद्र महाराज ढोन्नर, मंगळवार दि.२९ गोविंद महाराज करंजकर, बुधवार दि.३० भागवत महाराज बादाडे व गुरुवार दि.३१ मदन महाराज वर्पे यांची कीर्तन सेवा होणार होणार असून शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ११ कथा प्रवक्ते व कीर्तनकार ॲड.शंकर महाराज शेवाळे ( पुणे ) यांचे काल्याचे कीर्तन व सोहळ्याची सांगता होईल. गुरुवार दि.३१ जुलै रोजी सायं.६.३० कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब थोरात व कांचन बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी माजी आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गा तांबे, आ. सत्यजीत तांबे, इंद्रजीत थोरात, डॉ. जयश्री थोरात यांचे सह कारखान्याचे सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहे.

तरी या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक मंडळाचे उपाध्यक्ष व कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, कार्याध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार व सांस्कृतिक मंडळाच्या सर्व संचालकांनी केले आहे.

# अभिषेक वाणी सी. ए. परीक्षा उत्तीर्ण



**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**

संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील अभिषेक पोपट वाणी याने पहिल्याच प्रयत्नामध्ये सी. ए. ही पदवी प्राप्त केल्याबद्दल त्याचा येथील विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते गंगाधर वाणी, ॲड. पोपट वाणी, गोरक्षनाथ वाणी, डॉ. भारत वाकचौरे, गोकुळ वाणी, शिंदे, मधुकर वाणी, सतीश वाणी, महेश वाणी, सुदाम वाणी, जिजाबापू वाणी, मुख्याध्यापक प्रभाकर सांगळे, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन्मानाला उत्तर देताना अभिषेक वाणी यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम घेण्याचे, तसेच आपल्या आई-वडिलांचे, आपल्या गावाचे, आपल्या कुटुंबाचे नाव मोठे करण्याचे व आपले भविष्य उज्वल करण्याचे मार्गदर्शन केले.

# उर्दू शाळेत नववी, दहावीचे वर्ग सुरु करण्याची रौफ शेख यांची मागणी

**नायक वृत्तसेवा, साकुर**

संगमनेर तालुक्यातील साकुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दु माध्यमाची पश शाळा असुन या ठिकाणी इयत्ता पहिली ते इयत्ता ८ वी पर्यंतचे वर्ग सुरु आहेत. परंतु ८ वी नंतर पुढील माध्यमिक शिक्षणाची सोय नसल्याने विद्यार्थी शाळाबाह्य होत आहेत. त्यामुळे येथे नववी आणि दहावीचे वर्ग सुरू करण्यात यावेत अशी मागणी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे राज्य कार्यकारणी सदस्य रौफ शेख यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली.

येथील उर्दू प्राथमिक शाळेत नववी आणि दहावीचे वर्ग नसल्याने विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण वाढत आहे. या पार्श्वभूमीवर भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे राज्य कार्यकारिणी सदस्य रौफ शेख यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांची भेट घेऊन लक्ष वेधले व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांचे सक्षमीकरण व दर्जावाढ अंतर्गत ८ वी ला जोडुन ९ वी आणि १० वी चे वर्ग सुरु करण्याची विनंती लेखी निवेदनाद्वारे केली. याचबरोबर आ. अमोल खताळ व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचीही भेट घेऊन रौफ शेख यांनी या मागणीचे निवेदन दिले असुन त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत या मागणीचा विचार करण्यासाठी शिफारस केली आहे.

# गरजू विद्यार्थ्यांना केले शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**नायक वृत्तसेवा, राजूर**

अकोले तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील एकूण १३ शाळांतील ४५० गरजू विद्यार्थ्यांना मुंबईच्या पारिजात संस्थेच्या वतीने व अनिल गंभिरे यांच्या प्रयत्नातून इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वितरण करण्यात आले.

'पारिजात- मुंबई' ही एक नोंदणीकृत संस्था असून ही संस्था दरवर्षी महाराष्ट्रातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन




तेथे सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्याचे अविरतपणे काम करत आहे. त्यांचा हा उपक्रम ९५ जि. प. शाळांमध्ये पोहोचला असुन मराठी शाळा टिकवण्यात त्यांचा मोलाचा हातभार आहे. तालुक्यातील दुर्गम आदिवासी भागातील माणिक ओझर, अंबित, शिसवद, कोथळे, सावरकुटे, माळवाडी (सावरकुटे), खडकी खुर्द, खडकी बुद्रुक, बलठण, करटूलेवाडी(बलठण), वैतागवाडी, करवंददरा, देवाचीवाडी (शिरपुंजे) या एकूण १३ शाळांमध्ये करण्यात आले. पारिजात संस्थेच्या वतीने रोहन दांगट, अनिल गंभिरे, कौशल जटार, सोहम जटार हे उपस्थित होते. तसेच संबंधित शाळेचे मुख्याध्यापक अंबादास भांगरे तसेच सहशिक्षक, सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.

नायक ANCHOR

# आ. खताळ यांच्या सूचनेनंतर पालिकेने दाखवली माणुसकी!

## पिंजारी कुटुंबीयांना पालिकेकडून भरीव मदत : जहागीरदार

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

संगमनेर गटार दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या रियाज जावेद पिंजारी यांच्या कुटुंबीयांना भरीव स्वरूपाची आर्थिक मदत शासनाकडून मिळवून दिली जाईल, असे आ. अमोल खताळ यांनी सांत्वनपर भेटीत सांगितले होते. आ. खताळ यांच्या सूचनेनंतर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी पिंजारी यांच्या घरी जाऊन माणुसकीच्या भावनेतून कुटुंबीयांचे सांत्वन करत भरीव स्वरूपाची आर्थिक मदत कुटुंबियांकडे सुपूर्त केली असल्याचे भाजप नेते व माजी उपनगराध्यक्ष जावेद जाहगीरदार यांनी सांगितले.

शहरातील कोल्हेवाडी रोडवर नॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल जवळ भूमिगत गटारीचे चेंबरमधील मैला काढत असताना अतुल रतन पवार या ठेकेदाराच्या कर्मचाऱ्यांचा चेंबरमध्ये गुदमरून मृत्यू झाला होता. त्यावेळी पवार याला वाचविण्यासाठी गेलेल्या रियाज जावेद पिंजारी याचाही उपचार सुरू असताना मृत्यू झाला होता. या घटनेतील मयत अतुल पवार याच्या कुटुंबीयांना नगर परिषदेच्या वतीने १० लाखांची आर्थिक मदत देण्यात आली. परंतु रियाज पिंजारी हा सुद्धा मित्राला वाचविण्यास गेला होता म्हणून त्यालाही आर्थिक मदत मिळावी अशी मागणी आ. अमोल खताळ यांच्याकडे पिंजारी यांच्या नातेवाईकांनी केली होती.



त्यानुसार माणुसकीच्या भावनेतुन पिंजारी कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यात यावी अशी चर्चा आ. अमोल खताळ आणि मुख्याधिकारी रामदास कोकरे यांच्यात झाली. त्यानुसार मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी पिंजारी कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. व माणुसकीच्या भावनेतून पिंजारी कुटुंबीयांना भरीव स्वरूपातील आर्थिक मदत दिल्याबद्दल आ. अमोल खताळ यांनी मुख्याधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.

■ संगमनेर येथील रियाज जावेद पिंजारी हा तरुण माणुसकीच्या भावनेतून अतुल पवार यास वाचविण्यास गेला होता. त्यामुळे पिंजारी यांच्या कुटुंबियांना सुद्धा मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत द्यावी अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी सभागृहात केली आहे. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व शिवसेना नेते एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर विशेष बाब म्हणून पिंजारी कुटुंबीयांना आमदार अमोल खताळ हे आर्थिक मदत मिळवून देतील असे ही माजी उपनगराध्यक्ष जावेद जहागीरदार यांनी सांगितले.

# प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी व्हा : तहसीलदार मोरे

**नायक वृत्तसेवा, शिर्डी**

राहाता तालुक्यातील शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी होऊन आपले पिक सुरक्षित करावे. असे आवाहन तहसीलदार अमोल मोरे व तालुका कृषी अधिकारी आबासाहेब भोरे यांनी केले. राहाता तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ ६४,८९५ हेक्टर आहे, व सरासरी खरीप क्षेत्र ४४,४४७ हे असून यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीन २५,३६३, मका ८६३७, कापूस १६५९, बाजरी ७३७, भुईमुग २९२ आदी पिकांची पेरणी झाली आहे. नैसर्गिक आपत्ती व रोगराईमुळे होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे यासाठी केंद्र आणि राज्य शासन संयुक्तपणे प्रधानमंत्री पिक विमा योजना राबवत आहे. भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेसाठी शेतकऱ्यांना अंतिम दि. ३१ जुलै निश्चित करण्यात आली आहे. कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी सहभाग ऐच्छिक आहे. बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी ७/१२ उतारा, आधार, बँक पासबुक, स्वयंघोषणापत्र व अग्रीस्टक नोंदणी क्रमांकासह अर्ज करून हप्ता भरावा. अर्जानंतर इ-पिक पाहणी नोंदणी अनिवार्य आहे.अधिसूचित पिकांसाठी संरक्षित रक्कम व शेतकरी हप्ता पुढीलप्रमाणे बाजरीसाठी प्रति हेक्टर संरक्षित रक्कम ३२,६४० असून शेतकरी हप्ता ६४० रू.आहे. मक्यासाठी संरक्षित रक्कम ३६,००० व हप्ता ३६० आहे. सोयाबीनसाठी संरक्षित रक्कम ५८,००० व हप्ता १,१६० आहे. भुईमुगसाठी संरक्षित रक्कम ४५,००० असून हप्ता ११२.५० आहे. तुरीसाठी संरक्षित रक्कम ४७,००० व हप्ता ९४० आहे. कापसासाठी संरक्षित रक्कम ६०,००० असून हप्ता १,८०० आहे. तसेच कांद्यासाठी संरक्षित रक्कम ६८,००० व हप्ता ५१० निश्चित करण्यात आला आहे.चुकीची माहिती दिल्यास पुढील पाच वर्ष कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही. नुकसान भरपाई थेट बँक खात्यात जमा केली जाणार आहे. अधिक माहितीसाठी १४४४७ हेल्पलाइनवर किंवा गावातील सहायक कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा तरी, अंतिम तारखेची वाट न पाहता शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मिनाक्षी पिडियार यांचे निधन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

शहरातील नामांकित हिंदमाता हेअर ड्रेसरचे संचालक राजेंद्र पिडियार यांच्या धर्मपत्नी मिनाक्षी यांचे आज पहाटे निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५६ वर्षांचे होते. काही वर्षांपूर्वी आलेल्या अर्धांगवायूच्या धक्क्यातून सावरत असताना मध्यंतरी त्यांना संसर्ग झाला होता. त्यावर उपचार सुरु असतानाच आज पहाटे एकच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. अतिशय सोज्ज्वळ आणि धार्मिक स्वभावामुळे त्यांनी परिसरातील महिलांमध्ये आदराचे स्थान मिळवले होते. त्यांच्या अकाली निधनाने त्या सर्वांनाही मोठा धक्का बसला आहे.

राजस्थानी सेन समाजातील पिडियार परिवाराने स्वकष्टाने शहरात लौकीक मिळवला आहे. या परिवारातील भजनसम्राट प्रदीप यांचेही याच वर्षी जानेवारीमध्ये (ता.९) हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले होते. त्यानंतर अवघ्या सात महिन्यातच दिवंगत प्रदीप यांच्या भावजई मिनाक्षी यांचेही अकाली निधन झाल्याने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे. मध्यप्रदेशातील खंडवा येथील माहेर असलेल्या मिनाक्षी यांनी लग्नानंतर महाराष्ट्राच्या परंपरेला आत्मसात करताना खूप लवकर मराठी भाषेवर प्रभूत्व मिळवले होते. अतिशय सोज्ज्वळ वाणी आणि धार्मिक वृत्तीमुळे शास्त्रीचौक परिसरातील



महिलांमध्ये भाभी म्हणून त्यांना आदराने ओळखले जातं.

काही वर्षांपूर्वी त्यांना अर्धांगवायूचा धक्काही बसला होता. मात्र आत्मबळाच्या जोरावर त्यातून त्या सावरत असतानाच मध्यंतरी त्यांना संसर्ग झाल्याने रुग्णालयात दाखल करावे लागले. गेल्या पंधरवड्यापासून त्यांच्यावर उपचार सुरु होते, त्यातून त्या सावरतील असे वाटत असतानाच आज (ता.१९) पहाटे एकच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पती, दोन मुलं, सून, विवाहित मुलगी, नातवंडे, पुतणे, भावजई असा मोठा मोठा परिवार आहे. आज सकाळी साडेअकरा वाजता संगमनेरच्या अमरधाममध्ये शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सेन समाजासह विविध क्षेत्रातील मोठा समुदाय उपस्थित होता.

# सीबीएसईच्या अभ्यासक्रमात शिवरायांचा फक्त ६८ शब्दांत उल्लेख : आ.सत्यजीत तांबे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



राज्यातील शालेय शिक्षण विभागाच्या पुढाकारामुळे आता सीबीएसईच्या धर्तीवर एनसीईआरटीचा अभ्यासक्रम सर्वच शाळांमध्ये लागू होणार असून, हा निर्णय स्वागतार्ह असल्याचे सांगत आ. सत्यजित तांबे यांनी या अभ्यासक्रमातील एका गंभीर त्रुटीकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, पहिली ते दहावीच्या सीबीएसई इतिहासाच्या अभ्यासक्रमात एकूण २२०० पानं असताना, त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा केवळ ६८ शब्दांत उल्लेख करण्यात आला आहे. हे अत्यंत निषेधार्ह असून, शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांना शिकवला गेला पाहिजे, अशी ठाम भूमिका आमदार तांबे यांनी सभागृहात मांडली.

छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण भारतासाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांचा इतिहास अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणं ही काळाची गरज आहे. परंतु, केवळ ६८ शब्दांत त्यांचं योगदान मांडणं हे अत्यंत दुर्दैवी असल्याचे आ. सत्यजीत तांबे यांनी म्हंटले. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास महाराष्ट्रासह देशातील विद्यार्थ्यांना समजावा, यासाठी एससीईआरटीने एनसीईआरटीला प्रस्ताव पाठवला असला तरी, या गंभीर मुद्द्यावर मंत्र्यांनी स्वतः दिल्लीला जाऊन केंद्रीय मंत्र्यांची भेट घेणे आवश्यक होते, असे मत तांबे यांनी व्यक्त केले होते. त्यांनी शासनाच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, यावर शासनाची पुढची भूमिका काय आहे? असा प्रश्न आ. तांबे यांनी उपस्थितीत केला.

या मुद्द्यावर उत्तर देताना शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले की, सीबीएसईचा अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद तयार करते, तर राज्यस्तरीय अभ्यासक्रम राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषद तयार करते. त्यांनी आ. तांबे यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत महत्त्वाचा असल्याचं मान्य करत सांगितलं की, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव अभ्यासक्रमात झाला पाहिजे. राज्यमंत्री भोयर यांनी स्पष्ट केलं की, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात दिल्लीला जाऊन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेतली आहे. शिवाजी महाराजांचा इतिहास सीबीएसईच्या सातवी व दहावीच्या इतिहासाच्या पुस्तकांमध्ये सन्मानपूर्वक समाविष्ट होण्यासाठी केंद्र सरकारकडून सकारात्मक आश्वासन देण्यात आलं आहे.

## दिल्लीला जाऊन पाठपुरावा करणार : मंत्री भोयर

■ या मुद्द्यावर सरकार गंभीर असून, आवश्यक तो सर्व पाठपुरावा करण्यासाठी आ. सत्यजीत तांबे यांच्यासह आम्ही सर्वजण दिल्लीला जाऊ असे आश्वासन देखील राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिले.

# ...अन्यथा इतिहास माफ करणार नाही

## माकपचे महाविकास आघाडीच्या नेत्यांना आवाहन

**नायक वृत्तसेवा, अकोले**

महाराष्ट्रभरातून लोकशाहीवादी संघटनांनी तीव्र विरोध केलेले महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक अखेर ९ जुलै रोजी विधानसभेत व १० जुलै रोजी विधान परिषदेत मंजूर करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील साधनसंपत्तीची लूट सोपी व्हावी व आपला द्वेषाधारीत मनुवादी धर्मांध अजेंडा राबविणे सोपे व्हावे यासाठी हा कायदा आणला जात आहे. स्वतंत्र विचारांच्या प्रत्येक नागरिकाच्या विचार व अभिव्यक्तीवर या विधेयकामुळे घाला घातला जातो आहे. लोकशाही वाचविण्याच्या या लढ्यात सर्व जनतेने सामील व्हावे यासाठी राज्यव्यापी जागृतीची मोहीम पक्षाकडून सुरु करण्यात येत आहे.

महाविकास आघाडीच्या प्रमुख तीन पक्षांनी हा प्रश्न गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे व हर्षवर्धन सपकाळ या शिरस्थ नेत्यांनी याबाबत पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. जन सुरक्षा विधेयक विधानसभेत येण्यापूर्वी या नेत्यांना भेटून याबाबतचे गांभीर्य त्याच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न माकपने केला होता. हा प्रश्न गांभीर्याने घ्यावा असे आवाहन आता पुन्हा या नेत्यांना व सर्व पुरोगामी पक्षांना माकप करत आहे.

शेतकरी, शेतमजूर, कामगार, कर्मचारी, महिला, विद्यार्थी, युवक, कष्टकऱ्यांची बाजू घेणाऱ्या संघटनांचा बंदोबस्त करण्यासाठीही या कायद्याचा वापर होणार आहे. सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यां सोबतच लेखक, कवी, साहित्यीक, पत्रकार यांच्यासह सर्वच नागरिकांच्या लोकशाही अधिकारांचा व अभिव्यक्तीचा संकोच या कायद्यामुळे होणार आहे. सर्वांना बरोबर घेऊन लोकशाहीच्या रक्षणासाठी माकप याविरोधात व्यापक जनजागृती करत असून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ही मोहीम राबविली जात आहे. सर्वच लोकशाहीवादी व्यक्ती व संघटनांनी या लढ्यात उतरत लोकशाही रक्षणासाठी योगदान द्यावे असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात येत आहे.

# ‘मिशन आरंभ’ लोकचळवळ झाली : पाटील

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेतील यश हे ‘मिशन आरंभ’ या उपक्रमाची फलनिष्पत्ती आहे. राज्यभरात आपल्या उपक्रमाचे अनुकरण होत असून या उपक्रमामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पट वाढला आहे, त्यामुळे मिशन आरंभ लोक चळवळ झाली असल्याचे प्रतिपादन जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील यांनी काढले.

येथील जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये संगमनेर तालुक्याची ‘मिशन आरंभ’ कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत पाटील बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेतील यश हे मिशन आरंभ या उपक्रमाची फलनिष्पत्ती आहे. राज्यभरात आपल्या उपक्रमाचे अनुकरण होत आहे. या उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पाचवीचा पट वाढला आहे. सर्व शिक्षकांनी यशाचे हेच सातत्य कायम ठेवून अजूनही उत्तुंग यशाची भरारी घ्यायची आहे. त्यासाठी नियोजन, विश्लेषण,मेहनत व त्याग यांचा अवलंब करायचा असल्याचे ते म्हणाले.

यावेळी ‘मिशन आरंभ’ उपक्रमाच्या जिल्हा नोडल अधिकारी जयश्री कारले, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड यांची ही भाषणे झाली. कार्यशाळेत नवोदय व जिल्हा शिष्यवृत्तीधारक झालेल्या विद्यार्थी व त्यांचे वर्ग शिक्षक यांचा सन्मान करण्यात आला. ट्रॉफी व सन्मानपत्र यासाठी शिक्षक नेते शिवाजी दुशिंग यांनी सहकार्य केले.

यावेळी संदीप पावसे, बाळासाहेब जाधव, कल्याण राऊत, बाळासाहेब जाधव, डॉ. माणिक शेवाळे, प्राचार्य डांगे, मंगला कलगुंडे, दत्तात्रय मैड, नंदा वलवे, श्रीमती ठोकळ, सुनील नरसाळे, सुभाष राहणे, रविंद्र अनाप, विनायक भोसले, पार्वती गाडेकर, आशा घुले, कल्पना बिडवे उपस्थित होते.

# भाजप सामान्य कार्यकर्त्याला सन्मान देणारा पक्ष : गुंजाळ

**नायक वृत्तसेवा, आश्वी**



भाजपाचा प्रत्येक कार्यकर्ता राष्ट्रीयत्वाच्या विचारांनी प्रेरित होऊन, भारतमातेला परम वैभवशाली करण्याच्या दृष्टिकोणातून त्याग आणि समर्पण भावनेने कार्य करत असतो. जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. सुजय विखे पाटील यांनी दाखवलेल्या विश्वासावर संगमनेर तालुक्यात शहराबरोबरच ग्रामीण भागात भाजप पोहचवण्यासाठी आपण कटिबध्द असून भाजप हा सामान्य कार्यकर्त्याला सन्मान देणारा पक्ष असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पार्टीचे नविन राज्य परिषद सदस्य दादा गुंजाळ यांनी केले.

राज्यातील भारतीय जनता पार्टीच्या राज्य परिषद सदस्याची नुकतीच निवड करण्यात आली. यात तालुक्यातील कोल्हेवाडी येथील दादा गुंजाळ यांची वर्णी लागली. त्यामुळे त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या सत्काराला उत्तर देताना गुंजाळ बोलत होते. यावेळी भाजपच्या शहराध्यक्षा पायल ताजणे, आशिष ताजणे, रामभाऊ राहणे, अंकुश रहाणे, शशिकांत मतकर, वसंत देशमुख भिमराव भिंगारे, रोहिदास साबळे, डॉ. महेंद्र कोल्हे, शेषराव देशमुख, वैभव लांडगे, कैलास गोडसे, यासह भाजप तसेच महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी रविंद्र देशमुख, सरपंच नारायण गुंजाळ, धोडिंबा रहाणे, विकास मतकर, बाच्छाव गुंजाळ, डॉ. अभय बांगाळकर, सतिश वाळुंज, पोपट शिंदे, कैलास भरितकर, एकनाथ काळे, कैलास बिबवे, किरण गवळी आदींची भाषणे झाली.

■ तालुक्यातील भाजपाचे ज्येष्ठ सदस्य दादा गुंजाळ यांची भाजप राज्य परीषद सदस्य म्हणून निवड झाल्यामुळे शहराबरोबरच ग्रामीण भागामध्ये खऱ्या अर्थाने भाजप वाढीसाठी मदत मिळणार आहे. त्यांच्या अनुभवाचा फायदा मला भाजप शहराध्यक्षा म्हणून काम करताना नक्की होईल असा विश्वास शहराध्यक्षा पायल आशिष ताजणे यांनी यावेळी व्यक्त केला.

# ‘जागतिक युवा कौशल्य दिन’ उत्साहात साजरा

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**




सात्रळ येथील लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ‘जागतिक युवा कौशल्य दिवस’ विद्यार्थी केंद्रित उपक्रम घेऊन उत्साहात साजरा करण्यात आला.

संयुक्त राष्ट्रांच्या उपक्रमांतर्गत हा दिवस जगभरातील युवकांमध्ये कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी पाळला जातो. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंगोटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्या डॉ. जयश्री सिनगर होत्या.

‘२१ व्या शतकात कौशल्यांची गरज’ या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधताना प्राचार्य डॉ. शिंगोटे म्हणाले, तांत्रिक कौशल्याबरोबरच संवाद कौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता आणि नेतृत्वगुण यांचा विकासही अत्यंत आवश्यक आहे. तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये सुरू असलेल्या कौशल्याधिष्ठीत कोर्सचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. आर. एस. तांबे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रास्ताविक महाविद्यालय ‘कौशल्य विकास कक्ष’ प्रमुख प्रा. एच. एल. दिवेकर यांनी केले तर आभार प्रा. ए. एन. खैरे यांनी मानले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्या, कौशल्य विकास समितीचे सदस्य प्रा. तुषार कडसकर यांचेही सहकार्य लाभले.

# संगमनेरचा सहकार पॅटर्न राज्यासाठी मार्गदर्शक : बारी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




महाराष्ट्रात सुरू झालेली सहकाराची संकल्पना जगमान्य झाली असून सहकारातून गोरगरिबांची खरी प्रगती झाली आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्यातील दूध संघ व इतर सहकारी संस्था या राज्यातील व देशातील सहकारासाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या असून संगमनेरचा सहकार पॅटर्न हा सर्वत्र अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार सहकारी संस्थेचे विभागीय उपनिबंधक चंद्रशेखर बारी यांनी काढले.

विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था ( दुग्ध ) नाशिक,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था अहिल्यानगर आणि संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमित्ताने सहकार दिंडी व सहकार परिसंवादात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चेअरमन रणजीतसिंह देशमुख होते तर व्यासपीठावर माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, पांडुरंग घुले, शंकर खेमनर, सुधाकर जोशी, संपत डोंगरे, आर. बी. राहणे, विलास वर्पे, संतोष मांडेकर, विलास कवडे, गोरख नवले, मारुती कवडे, विक्रम थोरात, बापूसाहेब गिरी, प्रा.बाबा खरात, शेखर जाधव, माजी दूध विकास अधिकारी भांगरे, कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी, फायनान्स मॅनेजर जी. एस. शिंदे, शिवाजी खुळे सह विविध पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राजहंस दूध संघ ते सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात स्मृतिस्थळ व अमृतवाहिनी बँक यादरम्यान सहकारातील कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी भव्य सहकार दिंडी काढली. यावेळी स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांना अभिवादन करण्यात आले.

डॉ. सुधीर तांबे यांचेही यावेळी भाषण झाले. प्रास्ताविक कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ व सुरेश जोंधळे यांनी तर विलास कवडे यांनी आभार मानले. यावेळी दूध उत्पादक, शेतकरी, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■ संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाने १५०० लिटर दूध संकलनापासून सुरुवात केली असून आज सुमारे ४ लाख लिटर दूध संकलन केले जात आहे. तालुक्यामध्ये २०० दूध संस्था कार्यरत असून सुमारे ५५० कोटींची उलाढाल होत आहे. दरमहा साधारण पन्नास कोटी रुपये दूध उत्पादनातून तालुक्यात येत असून यामुळे शेतकऱ्यांना ६०० कोटी वार्षिक मिळत असल्याचे संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांनी यावेळी सांगितले.

नायक ANCHOR

# घरकुलांसाठी भूमिहीनांना हक्काची जमीन देण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा निर्णय

## आ. अमोल खताळ यांच्या पाठपुराव्याला यश

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



जिल्ह्यातील भूमिहीनांना घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी हक्काची जमीन मिळावी, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती, या मागणीची त्यांनी दखल घेतली आणि त्यांच्या सूचनेनंतर संपूर्ण जिल्ह्यातील घरकुलांसाठी भूमिहीनांना हक्काची जमीन देण्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी निर्णय घेतला आहे, त्यामुळे भूमीहीनांना दिलासा मिळाला आहे.

भूमिहीन लाभार्थ्यांसाठी शासकीय, गायरान आणि गावठाण विस्तार योजनेंतर्गत शिल्लक भूखंड तत्काळ उपलब्ध करून देण्यात येणार असून हजारो गरजू कुटुंबांना स्वतःचे घरकुल उभारण्यासाठी जमीन उपलब्ध होणार असल्याबाबतचे परिपत्रक जिल्हाधिकारी कार्यालयाने जारी केले आहे. त्यामुळे भूमिहीनांना आता घरे बांधण्यास कुठलीही अडचण येणार नाही. आमदार अमोल खताळ यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर या निर्णयामुळे यश आले आहे. तहसीलदार यांनी गायरान व शासकीय जमिनींची नोंद घेऊन त्यानुसार लँड बँक तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. गावनिहाय लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या घरकुलासाठी आवश्यक जमिनीचा आराखडा तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतींपासून उपविभागीय कार्यालयांपर्यंत संपूर्ण साखळीबद्ध व वेळेत पूर्ण होणारी प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे. ना हरकत दाखले, अभिप्राय, स्थळ निरीक्षण, ताबा प्रक्रिया इत्यादींसाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. घरकुल बांधकामासाठी २ वर्षांची अट असुन वाटप झालेल्या जमिनीवर लाभार्थ्यांनी २ वर्षात घरकुल उभारणे आवश्यक आहे, अन्यथा ती जमीन अन्य लाभार्थ्याला वितरित केली जाणार.

■ मी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत या प्रश्नावर आवाज उठवला होता.अनेक भूमिहीन लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ मिळत नव्हता. आता जिल्हाधिकाऱ्यांच्या परिपत्रकामुळे ही मागणी मान्य झाली आहे. ही योजना पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होणार आहे, यासाठी मी स्वतः लक्ष ठेवणार आहे. ग्रामविकासासाठी हा टप्पा अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे आ.अमोल खताळ यांनी सांगितले.

## पाहिजेत
### धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |


पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर

शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.

१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155


NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

KADLAG INVESTMENT
FRANKLIN TEMPLETON
A BLEND OF ASSETS
Build with an aim to adapt through every market mood.

Equity Debt Commodities
Stay Tuned!
New Fund Offer Unit @ ₹10/-
FRANKLIN INDIA MULTI ASSET ALLOCATION FUND
NFO NOW OPEN
NFO CLOSES: JULY 25, 2025
KADLAG
INVESTMENT
• म्युच्युअल फंड्स • एस.आय.पी. • पी.एम.एस. • एन.पी.एस. • सिस्टीमॅटीक विड्रॉल प्लॅन • सिस्टीमॅटीक ट्रान्सफर प्लॅन • टर्म लाईफ इन्शुरन्स • मेडीक्लेम
एस.- 5, दुसरा मजला, टॉप टेन इम्पिरीअल, यशोधन समोर, संगमनेर
HELP LINE : 9150306306 | 9422840886 | 9142773000 | 9142559000


दर्शन
टेक्सटाईल मार्केट
आजची स्त्री, आजचा स्टाइल
दर्शन टेक्सटाईल मार्केट

संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सिल्क फेस्टीव्हल

लवकरच
सुरू होत आहे
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव सिल्क साड्यांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१०३११५५
Design Addict

## ‖ अभीष्टचिंतन सोहळा ‖



शिक्षण प्रसारक संस्थेचे (संगमनेर महविद्यालय) चेअरमन,
गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष,
एशियन योगासन संघाचे अध्यक्ष, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

**मा.डॉ. संजयभाऊ मालपाणी**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

यांच्या ५६ व्या
वाढदिवसानिमित्त संकल्पित

दंडकारण्य मोहिमेंतर्गत
हरित वसुंधरा अभियानानिमित्त
महाराष्ट्र शासन उपवनविभाग, संगमनेर मालपाणी परिवार चॅरिटेबल ट्रस्ट, संगमनेर यांचे अर्थसहाय्याने ग्रामपंचायत खांडगाव आणि सर्व ग्रामस्थ यांचे लोकसहभागातून

### ५६ हजार वृक्षारोपणाचा
## शुभारंभ

रविवार, दि. २० जुलै २०२५ सकाळी ८ वा.
स्थळ - श्री खांडेश्वर मंदिर ते श्री कपारेश्वर महादेव मार्ग

• सर्वांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे.
• विनंती - कृपया भेटवस्तू आणू नयेत. द्यायचीच असल्यास हार-गुच्छ याऐवजी आपल्या इच्छेनुसार वह्या दिल्यास त्या गरजवंत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्या जातील.

GADEKAR-RUDRABHATE & ASSOCIATES
Vaishali Chamber, New Nagar Road, Abhinav Nagar, Sangamner-422605
Consulting Civil Engineer
R.C.C. Designer
Govt. Regd. Valuer

UNITY BUILD TECH PVT LTD.
Industrial Projects & Land Development
Commercial & Institutional Building Projects
Residential Projects
Venue : Unity Build Tech Pvt. Ltd. Office No. - 401, SAUMITRA Building, Income Tax Lane No. 14, Prabhat Road, Pune
e-mail : unity_buildtech@yahoo.co.in
web : www.unitybuildtech.com
Shailendra Gadekar Mo.9860797927
Pravin Rudrabhate Mo. 9860797928
Rajaram Joshi Mo.9860797914
Ajitsinh Naik Nimbalkar Mo.7709041095

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
कुटे हॉस्पिटल अँण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • अॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५